महाराष्ट्र पब्लिकेशन
ग्रामीण भागातील धडपडणाऱ्या तरुणाईसाठी

TCS-IBPS पॅटर्न नुसार

# वनरक्षक प्लॅनर 2025

वनसेवक पदांसाठी उपयुक्त







- वनविषयक तांत्रिक माहिती
- 2019 प्रश्नपत्रिका (प्रत्येक प्रश्नाच्या स्पष्टीकरणासह)
- 2024 च्या प्रश्नपत्रिका (प्रत्येक प्रश्नाच्या स्पष्टीकरणासह)
- अपेक्षित सराव प्रश्न

वनरक्षक ऑनलाईन बॅच
App- Maharashtra Academy, Pune

लेखक :
विठ्ठल बडे,
निवड PSI (महाराष्ट्र अकॅडेमी, पुणे)

25x25 mm

फसवणूक टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी QR कोड स्कॅन करूनच पुस्तक खरेदी करावे.

महाराष्ट्र पब्लिकेशन
ग्रामीण भागातील यशपडणाऱ्या तरुणाईसाठी

## TCS-IBPS पॅटर्न नुसार

# वनरक्षक प्लॅनर 2025



**वनसेवक पदांसाठी उपयुक्त**





- वनविषयक तांत्रिक माहिती
- 2019 प्रश्नपत्रिका (प्रत्येक प्रश्नाच्या स्पष्टीकरणासह)
- 2024 च्या प्रश्नपत्रिका (प्रत्येक प्रश्नाच्या स्पष्टीकरणासह)
- अपेक्षित सराव प्रश्न


लेखक :
**विठ्ठल बडे,**
निवड PSI (महाराष्ट्र अकॅडेमी, पुणे)


म.अ. महाराष्ट्र अकॅडेमी

**वनरक्षक ऑनलाईन बॅच**
**App- Maharashtra Academy, Pune**

25x25 mm

फसवणूक टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी QR कोड स्कॅन करूनच पुस्तक खरेदी करावे.


TCS-IBPS पॅटर्न नुसार वनरक्षक प्लॅनर 2025
लेखक : विठ्ठल बडे, निवड PSI (महाराष्ट्र अकॅडेमी, पुणे)



वनरक्षक
ऑनलाइन बॅच
विषय
मराठी, गणित,-बुद्धिमत्ता, GK, इंग्रजी
कालावधी - 1 वर्ष
TCS - IBPS पॅटर्न प्रमाणे
फी - 1000 रु.
ऑफर फी
फक्त 300 रु.
मार्गदर्शक
विठ्ठल बडे (निवड PSI)
ज्ञानदेव बडे ( निवड PSI, TCS 2 वेळा निवड)
ज्ञानेश्वर बांगर (PSI मुलाखत)
राहुल भैसडे (TCS तज्ज्ञ)
म.अ.
महाराष्ट्र अकॅडेमी
App- Maharashtra
Academy, Pune
whats app only
91 58 58 59 09

महाराष्ट्र पब्लिकेशन

ग्रामीण भागातील धडपडणाऱ्या तरुणाईसाठी

# वनसेवा (प्लॅनर)

- सोप्या भाषेत परिक्षाभिमुख मांडणी
- २०२५ पर्यंतची अपडेटेड आकडेवारी
- गोंधळ होणाऱ्या बाबी ठळकपणे नमूद
- भरपूर तक्ते, आकृत्या व नकाशे
- आवश्यक तेथे अफलातून ट्रिक्स
- २०१९ व २०२४ प्रश्नपत्रिका सखोल विश्लेषणासह
- आलेले व अपेक्षित तांत्रिक सराव प्रश्नसंच

लेखक

**विठ्ठल बडे**

(B. Pharm, M.A., B. Journalism, M.S.W.)

© वनसेवा (प्लॅनर) – सर्व हक्क महाराष्ट्र पब्लिकेशनकडे

◆ लेखक व संपादक – विठ्ठल बडे

✻ प्रकाशक –
चंद्रकला बडे
महाराष्ट्र पब्लिकेशन
मोबाईल नंबर – ९१५८ ५८ ५९०९
mahapublication2@gmail.com

**वितरणासाठी संपर्क –**

✻ जुपिटर बुक डेपो, पुणे. मोबा – ९८ ५० ९५ ६५ ४२
✻ आर्यन बुक डेपो, पुणे. मोबा – ९५ ५२ २९ २९२९
✻ विकास बुक एजन्सी, पुणे – ९८ ६० २८ ६४ ७२
✻ के. सागर बुक डिस्ट्रीब्युटर्स, पुणे – ८० ८७७ २२२ ७७
✻ पूनम बुक एजन्सी, पुणे – ९० ९६ ५४ ५४ ५१
✻ लोटस बुक डेपो, पुणे – ९८ ८१ ४४ ०३ ०१

✻ **द्वितीय आवृत्ती** – २०२५

✻ **कायदेविषयक सल्लागार** – ॲड. विवेकानंद बडे.

✻ **न्यायालयीन क्षेत्र** – मुंबई उच्च न्यायालय कक्षेत

✻ **मुखपृष्ठ** – श्री. राहूल भैसडे

✻ **अक्षरजुळणी** – महाराष्ट्र पब्लिकेशन टीम

✻ **मुद्रक** – पुणे

✻ **मूल्य** – ४८० रु.

# विशेष आभार

## अनिता घरत, अमृता चव्हाण, श्रीराम मापारी

पुस्तकातील बहुतांश आकडेवारी ही २०२५ पर्यंतची अपडेटेड आहे. आकडेवारीमध्ये सतत बदल होत असतात. पदाधिकारी, सांख्यकी इत्यादीमध्ये सतत बदल होत असतात. विद्यार्थ्यांनी ते अपडेट करावेत. त्यासाठी प्रकाशक जबाबदार असणार नाहीत.

या पुस्तकातील सर्व बाबी अचूक देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही अनावधाने काही उणिवा वा चुका राहिल्यास त्यास लेखक किंवा प्रकाशक जबाबदार राहणार नाही.

या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकाधीन आहेत. या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचे पुनर्मुद्रण केल्यास, त्याची साठवणूक केल्यास तसेच छायांकित प्रत काढल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी फक्त ओरिजनल पुस्तकच Google वर स्कॅन करूनच घ्यावे. या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचे पुनर्मुद्रण करताना आढळल्यास पुराव्यासह कळवल्यास ५,००० रुपये बक्षीस देण्यात येईल.

या पुस्तकाची डुप्लिकेट कॉपी मिळत असल्याचा पुरावा किंवा पत्ता निश्चितपणे सांगितल्यास संबंधिताला महाराष्ट्र पब्लिकेशन तर्फे ११,००० रुपये बक्षीस व प्रामाणिकपणाचे प्रशस्तीपत्र देण्यात येईल. (संपर्क– ९१५८५८ ५९०९)

पुस्तकासंबंधी काही शंका, अडचण किंवा सूचना असल्यास संपर्कासाठी व्हाट्सअप क्रमांक – ९१५८५८ ५९०९ (फक्त मेसेज करावा.)

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

2019 वर्षाआधी वनरक्षक भरती ही बारावी पास आणि धावणे यावर होत असे. परंतु, वन विभागामध्ये फक्त मैदानीच नाही, तर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आवश्यक आहेत, असं शासनाच्या लक्षात आल्यानंतर शासनाने लेखी परीक्षा आधी आणि नंतर मैदानी चाचणी अशी प्रक्रिया अवलंबवायला चालू केली. शासन निर्णयानुसार 120 गुणांची लेखी परीक्षा आणि 80 गुणांची मैदानी चाचणी या स्वरूपाची परीक्षा घेण्यास सुरुवात झाली.

2023 मध्ये नवीन शासन निर्णयानुसार सरळ सेवेच्या सर्वच परीक्षा टीसीएस व आयबीपीएस या कंपन्याकडे देण्यात आल्या. कंपनीने सुद्धा पुढे त्याच नियमानुसार परीक्षा घेतली. परंतु 120 प्रश्न ऐवजी 60 प्रश्नांची ही परीक्षा झाली. 60 प्रश्न असून 120 गुण देण्यात आले. 80 गुण मैदानी साठी ठेवण्यात आले. येणारी वनरक्षक भरती ही सुद्धा त्याच पॅटर्ननुसार असणार आहे. सर्व विद्यार्थ्यांनी त्याच पॅटर्न प्रमाणे अभ्यास करणे आवश्यक आहे.

टीसीएस कडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा या पोलीस भरती किंवा एमपीएससी पेक्षा काहीशा वेगळ्या असतात. उदाहरणार्थ विशिष्ट घटकावर पुन्हा पुन्हा प्रश्न येतात, प्रश्नांचा पॅटर्न तोच असतो. काही घटका खालील प्रश्न एकदम सोपे, तर काही घटका खालील प्रश्न एकदम अवघड टाकण्याचा टीसीएसचा इतिहास आहे. वनरक्षक भरती मध्ये इतर परीक्षांपेक्षा तुलनेत सोपा पॅटर्न असतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी उगाचच अवघड मार्गाने जाऊ नये.

झालेल्या प्रश्नांचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक प्रश्न विश्लेषण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षेला सामोरे जाणे योग्य होणार नाही. त्यानुसार या पुस्तकाची मांडणी केलेली आहे. प्रत्येक प्रश्नाचे विश्लेषण आवश्यक आहे, कारण फक्त गणित बुद्धिमत्ता यांचे विश्लेषण करून इंग्रजी आणि सामान्य ज्ञान यांचा अंदाज येणार नाही. सामान्य ज्ञान या घटकामध्ये वन विभागावर सर्वाधिक प्रश्न येतात. त्यांचा वेगळा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यानुसार वेगवेगळ्या प्रकारची स्ट्रॅटेजी या पुस्तकात तुम्हाला दिसून येईल.

'महाराष्ट्र अकॅडमी' या ॲप्लिकेशन मध्ये तुम्हाला वनरक्षक भरतीसाठी खास टीसीएस पॅटर्ननुसार ऑनलाइन बॅच उपलब्ध आहे. ही बॅच तुम्ही नक्की घ्या. या बॅचचा तुम्हाला फायदचा होईल.

चंद्रकला बडे

(प्रकाशक – महाराष्ट्र पब्लिकेशन)

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | वनविभागविषयी माहिती | ६ |
| २ | परीक्षाभिमुख माहिती | १५ |
| ३ | मागील वर्षी आलेले प्रश्न | ६४ |
| ४ | अपेक्षित प्रश्नसंच (स्पष्टीकरणासह) | ८३ |
| ५ | २०१९ झालेल्या प्रश्नपत्रिका | १०४ |
| ६ | २०२४ झालेल्या प्रश्नपत्रिका | २६८ |



**TCS पॅटर्न नुसार**
**वनरक्षक पदाची संपूर्ण**
**LIVE Batch घेण्यासाठी**
**‘Maharashtra Academy’**
**हे ॲप आत्ताच डाऊनलोड करा.**

## लेखी परीक्षा अभ्यासक्रम – १२० गुण

१) सर्व उमेदवारांची १२० गुणांची स्पर्धात्मक लेखी परीक्षा व ८० गुणांची धावण्याची चाचणी घेण्यात येईल. लेखी परीक्षा ही ऑनलाईन पद्धतीने (Computer based Test) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात आयोजित करावी.

२) लेखी परीक्षेचा दर्जा हा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या दर्जापेक्षा निम्न राहणार नाही. लेखी परीक्षेमध्ये खालीलप्रमाणे ४ विषयांना गुण देण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | सामान्य ज्ञान, जैव विविधता, वने, वन्यजीव, पर्यावरण संतुलन | ३० |
| २ | बौद्धिक चाचणी | ३० |
| ३ | मराठी | ३० |
| ४ | इंग्रजी | ३० |

सामान्यज्ञान या विषयाची प्रश्नपत्रिका तयार करताना राज्याचा भूगोल, सामाजिक इतिहास वन, पर्यावरण, हवामान इ. बाबींचा अंतर्भाव राहील.

३) लेखी परीक्षेच्या आधारे शारीरिक चाचणीकरीता पात्र ठरण्याकरिता उमेदवाराने लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. ज्या उमेदवारांना किमान ४५% गुण मिळणार नाही ते उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

**सामान्य ज्ञान या घटकांमध्ये वने पर्यावरण वन्यजीव जैवविविधता इत्यादी घटकावर दहा ते पंधरा पर्यंत प्रश्न असतात. हे गुण मेरीट ठरवणारे आहेत, याची काळजी घ्या. हा घटक दोन–तीन वेळा वाचला तरी लक्षात येतो.**

## मैदानी चाचणी – ८० गुण

### पुरुष उमेदवार ५ कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकूण गुण : ८०)

| अ.क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावधी मिनिटांमध्ये | अनुज्ञेय गुण |
|---|---|---|
| १ | १७ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ८० |
| २ | १७ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १८ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ७० |
| ३ | १८ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १९ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ६० |
| ४ | १९ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ५ | २० मिनिटांपेक्षा जास्त परंतु २१ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ४५ |
| ६ | २१ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २२ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ४० |
| ७ | २२ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २३ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| ८ | २३ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २४ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ३० |
| ९ | २४ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २५ |
| १० | २५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २६ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २० |
| ११ | २६ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २७ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| १२ | २७ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २८ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| १३ | २८ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २९ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ५ |
| १४ | २९ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ० |
| ३० मिनिटांमध्ये ५ कि.मी. धावू न शकणारा पुरुष उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होईल. | | |

## महिला उमेदवार ३ कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकूण गुण : ८०)

| अ.क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावधी मिनिटांमध्ये | अनुज्ञेय गुण |
|---|---|---|
| १ | १२ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ८० |
| २ | १२ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १३ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ७० |
| ३ | १३ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १४ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ६० |
| ४ | १४ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ५ | १५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १६ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ४५ |
| ६ | १६ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १७ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ४० |
| ७ | १७ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १८ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| ८ | १८ मिनिटांपेक्षा जास्त परंतु १९ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ३० |
| ९ | १९ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २५ |
| १० | २० मिनिटांपेक्षा जास्त परंतु २१ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २० |
| ११ | २१ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २२ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| १२ | २२ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २३ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| १३ | २३ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २४ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ५ |
| १४ | २४ मिनिटांपेक्षा जास्त परंतु २५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ० |
| २५ मिनिटांमध्ये ३ कि.मी. धावू न शकणारी महिला उमेदवार भरती प्रक्रियेतून काय होईल. | | |



# बाळकृष्ण बडे
## वनरक्षक (महाराष्ट्र वन विभाग)

***नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,***

वनविभागात नोकरी लागणे म्हणजे मी माझे भाग्य समजतो; कारण तो माझे बालपण ग्रामीण भागात गेल्यामुळे मला पशु, पक्षी, निसर्ग यांची आवड होती. मागील सहा वर्षाच्या अनुभवात मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. इतर विभागात नोकरीपेक्षा वन विभागातील नोकऱ्या काहीशा वेगळ्या स्वरूपाच्या असतात. या विभागात कामाची विविधता असते. गट क च्या पदांनाही अनेक अधिकार असल्याने कामाच्या बाबतीत समाधानी आहे. वेतन, भत्ते, बढती या बाबीही इतर विभागांच्या तुलनेत चांगले आहेत. कामाचा अतिताण नसल्याने आरोग्यही चांगले राहते, तसेच इतर छंद जोपासता येतात. ज्या विद्यार्थ्यांना अभ्यास करायचा आहे त्यांच्यासाठी हा विभाग अतिशय चांगला आहे. ग्रामीण भागातील तळमळीने अभ्यास करणाऱ्या मुलांना/ मुलींना वनविभागाबाबत अनेक प्रश्न असतात. त्याबाबतची चर्चा पुढे केली आहे.

**कामाचे क्षेत्र किती असते ?**

साधारणपणे एका वनरक्षकाकडे १००० हेक्टर इतके क्षेत्र अंदाजे चार ते पाच गावांची हद्द असते. यावर वनरक्षकाचे थेट नियंत्रण असते. त्याला तांत्रिक भाषेत बीट असे म्हणतात.

**कामाचे स्वरूप कसे असते ?**

वरिष्ठांनी आखून दिलेल्या क्षेत्रांमध्ये वन विभागाशी संबंधित वन खात्याशी संबंधित घडणारे गुन्हे, जसे वन्यजीवांची शिकार, वृक्षतोड या गुन्ह्यावर नियंत्रण ठेवणे, गुन्ह्यांची नोंद करणे, गुन्हेगारावर वचक ठेवणे, इत्यादी कामे वनरक्षकांना करावी लागतात. अनेक शासकीय योजना जसे की वृक्षरोपण, वृक्ष संवर्धन, आदिवासी लोकांना विविध सुविधांचे वाटप करणे, विविध कायद्यांची अंमलबजावणी करणे इत्यादी. वन्यजीव धोक्यात असल्यास त्यांचे संरक्षण करणे तसेच वन्यजीवांमुळे इतरांना धोका निर्माण झाल्यास वन्यजीवांचा बंदोबस्त करणे अशा स्वरूपाची ही कामे असतात. अनेकदा राखीव वनांमध्ये विविध कारणामुळे वनवा पेटतो, तो वनवा विझवण्यासाठी इतर यंत्रणांची मदत घेणे व होणारे अधिक नुकसान टाळणे इत्यादी कामे असतात.

**युनिफॉर्म असतो का ?**

वनविभागातील प्रत्येक कर्मचाऱ्यांना खाकी रंगाचा युनिफॉर्म असतो. वनरक्षकांना लाल रंगाचे बूट, टोपी, बेल्ट असतात.

**प्रशिक्षण कसे असते ?**

वनविभागात निवड झाल्यानंतर पुरुष व महिला प्रशिक्षाणार्थिंना सहा महिन्याचे निवासी प्रशिक्षण असते. या काळात शासनाकडून नियमित पगार, भत्ते या सुविधा मिळतात. तसेच प्रवास खर्चही शासनाकडून केला जातो. प्रशिक्षण काळामध्ये राज्यातील विविध वनक्षेत्रामध्ये अनेक प्रकारची माहिती देऊन प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्र राज्यामध्ये चार ठिकाणी वनरक्षक प्रशिक्षण केंद्र आहेत. यामध्ये विविध अभ्यास दौरे आयोजित करून प्रशिक्षाणार्थिना प्रशिक्षित केले जाते. पोलीस खात्याप्रमाणे प्रशिक्षण खडतर नसते, त्यामुळे प्रशिक्षणाचा आनंद मिळतो.

**सुट्ट्या किती असतात ?**

प्रत्येक आठवड्याला एक साप्ताहिक सुट्टी मिळते. यासोबतच एका वर्षात आठ किरकोळ रजा मिळतात. ज्या आपण घरगुती कारणास्तव किंवा वैयक्तिक कारणास्तव वापरू शकतो. त्यासोबतच ३० अर्जित रजा मिळतात. या रजा वरिष्ठांना कळून उपभोगता येतात. एका वर्षात ३० अर्धपगारी (पूर्ण पगारी १५) वैद्यकीय रजा मिळतात. म्हणजेच वैद्यकीय कारणास्तव १५ दिवस गैरहजर असले तरीही पूर्ण वेतन मिळते. याव्यतिरिक्त अधिक वैद्यकीय रजा गरज पडल्यास मिळतात.

**महिला वनरक्षकांना प्रसूतीच्या वेगळ्या सुट्ट्या असतात का ?**

राज्य शासनाच्या सर्वच खात्यातील महिला कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतनी सहा महिने प्रसुती रजा मिळतात. या नोकरीच्या कालावधी दरम्यान दोन वेळा उपभोगता येतात. पुरुष कर्मचाऱ्यांना लहान मुलांच्या सांभाळासाठी १५ दिवस वेतनी पॅटर्नल रजा मिळतात.

**अभ्यासाला वेळ मिळतो का ?**

उमेदवाराची निवड झाल्यानंतर बहुतेक ठिकाणी अनेक उमेदवार पुढील परीक्षांचा अभ्यास करतात. कार्यालयीन कामाचा जास्त ताण नसल्यामुळे अभ्यासाला पुरेसा वेळ मिळतो, तसेच गरज पडल्यास वरिष्ठांकडून सुट्ट्या शिल्लक असल्यास मंजूर करून मिळतात. ज्या कर्मचाऱ्यांना पुढे अभ्यास करायचा आहे त्यांच्यासाठी इतर कोणत्याही गट क नोकरीपेक्षा अधिक वेळ वनरक्षक पदांना मिळतो.

**नियमित बदली बद्दल माहिती सांगा ?**

साधारणतः पाच वर्षानंतर वनरक्षकांची जिल्हा अंतर्गत बदली केली जाते. त्याआधी विनंती बदली होऊ शकते.

**आपल्या जिल्ह्यात बदली होते का ?**

शासनाच्या नियम व अटींची पूर्तता केल्यास वनरक्षकांची बदली केली जाते. वनरक्षक असलेल्या व्यक्तीचा पती किंवा पत्नी राज्य शासनाच्या इतर विभागात किंवा वनविभागात कार्यरत असेल तर पती-पत्नी एकत्रीकरण नियमा अंतर्गत एकाच तालुक्यात शक्य नसल्यास एकाच जिल्ह्यात बदली केली जाते. एखाद्या व्यक्तीच्या आई किंवा वडिलांपैकी एकच

जिवंत असेल तर त्यांच्या देखभालीसाठी संबंधित व्यक्तीची बदली केली जाऊ शकते. आई वडील, पती-पत्नी, मुले किंवा स्वतः ला गंभीर आजार असल्यास वैद्यकीय कारणास्तव बदली केली जाऊ शकते.

**वनरक्षक पदाच्या बढती बद्दल माहिती सांगा ?**

वनरक्षक म्हणून काम केलेल्या व्यक्तीची साधारणपणे दहा वर्षांनी वनपाल या पदी बढती केली जाते. वनपाल या पदी दहा वर्ष सेवा केलेल्या व्यक्तीची रेंजर (आर एफ ओ) पदी नियुक्ती केली जाते. वनरक्षकांची बढती ही वयानुसार नसून सेवा व गोपनीय माहिती, शेरे यानुसार केली जाते. ज्या व्यक्तीची ज्या उमेदवाराची १८-१९ वयात वनरक्षक म्हणून नेमणूक होते, त्या उमेदवाराला वर्ग एकचे (ACF) पदही मिळते.

**वनरक्षकांना किती वेतन मिळते ?**

वनरक्षक हे राज्य शासनाच्या संवर्गातील गट क चे पद आहे. या पदांना ग्रेड पे १८०० रुपये मध्ये टाकण्यात आले आहे. साधारणपणे नव्याने नियुक्त झालेल्या वनरक्षकांना ४०-४२ हजार रुपये इतके वेतन मिळतील. त्यामधील विविध कर, कपाती, भविष्य निर्वाह निधीतील रक्कम वजा केल्यास साधारणतः ३३-५८ हजार रुपये इतके वेतन बँक खात्यात जमा होते. आदिवासी भागांमध्ये, नक्षलग्रस्त भागांमध्ये शासनाच्या नियमाला अनुसरून अधिक वेतन मिळते. महानगराती, दुर्गम भागातील पदांना अधिकचा घर भाडे भत्ता मिळतो.

**निवृत्तीनंतर पेन्शन मिळते का ?**

सध्या निवृत्तीनंतर राज्य शासनातील कर्मचाऱ्यांना कोणतेही निवृत्ती वेतन मिळत नाही. नोकरीत असताना पगाराच्या तुलनेत काही निधी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करून त्यावर शासनातर्फे विशिष्ट व्याजदर आकारून निवृत्तीच्या दिनांकाच्या आसपास एक रकमी निधी दिला जातो. शासन स्तरावर जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा विचार आहे, परंतु अंमलबजावणी बद्दल काहीही सांगणे उचित होणार नाही.

**शासनाकडून राहण्याची सुविधा पुरवली जाते का ?**

शासनाने निर्माण केलेल्या पायाभूत सुविधेनुसार अनेक ठिकाणी वनरक्षक तसेच वरिष्ठ पदांना निवासाची सोय केली जाते. ज्या ठिकाणी निवासाची सोय केली जाते, त्यावेळी शासनाकडून दिला जाणारा घर भाडे भत्ता मिळत नाही. विवाहित कर्मचाऱ्यांना इतर विभागांच्या तुलनेत चांगल्या दर्जाची निवासी सुविधा उपलब्ध असते.

**वनरक्षक पदाच्या भरतीसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना काय सांगाल ?**

गट क मधील वनरक्षक हे एक चांगले पद आहे. ज्यांना यापुढेही स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करायचा आहे, तसेच निसर्गाच्या सानिध्यात राहून स्वतःचा छंद जोपासायचा आहे,जनतेची सेवा करण्याची इच्छा आहे, अशा विद्यार्थी मित्रांनी वनरक्षक पदाचा नक्की विचार करावा.

***सर्व विद्यार्थ्यांना वनविभागाच्या परीक्षांसाठी हार्दिक शुभेच्छा !!***

# वनरक्षक भरती तुमच्या प्रश्नांचे उत्तरे

– कु. अनिता घरत

**वनरक्षक भरतीचा पॅटर्न बदलेल का ?**

– पॅटर्न बदलण्याची अजिबात शक्यता वाटत नाही. बदलला तरी सुद्धा अभ्यासक्रम तोच राहण्याची शक्यता आहे. बदल झाला तर 60 प्रश्न किंवा 120 प्रश्न यापैकी एकच होईल.

**निगेटिव्ह पद्धती यावर्षी असेल का ?**

– 2019 मध्ये निगेटिव्ह पद्धत होती. परंतु 2024 मध्ये निगेटिव्ह पद्धत नव्हती. 2025 मध्ये असेल किंवा नसेल. त्याबद्दल आताच भाष्य करणे योग्य राहणार नाही. त्याचा विचार न करता विद्यार्थ्यांनी आपापला अभ्यास चालू ठेवावा. दोन्ही पद्धतीत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना फरक पडत नाही.

**स्टडी प्लॅन काय असावा ?**

– अभ्यास करत असताना, मागील वर्षीच्या प्रश्नपत्रिका समोर ठेवूनच पुढील स्ट्रॅटेजी आखावी. सर्वच विषय महत्त्वाचे आहेत. त्यामुळे सर्वच विषयांना गुणांनुसार वेळ देणे महत्त्वाचे आहे. तुमच्या स्वतःच्या अभ्यासानुसार कमकुवत घटक व्यवस्थित करून घ्या.

**नवीन विद्यार्थ्यांनी काय करावे ?**

जे विषय तुम्हाला सोपे वाटतात किंवा कमी वेळेत जास्त गुण देऊ शकतात, ते विषय/ घटक आधी कव्हर करून घ्या. मगच अवघड घटकाकडे वळा. एका विषयाला एकच संदर्भ पुस्तक वाचा. झालेल्या प्रश्नपत्रिका मात्र तोंड पाठ करून टाका. वेळ असेल तर सराव टेस्ट नक्की द्या.

**अनुभवी विद्यार्थ्यांनी काय प्लॅन करावा ?**

– ज्या विद्यार्थ्यांना 2–3 वर्षापासून कोणत्या ना कोणत्या स्पर्धा परीक्षेचा अनुभव आहे, त्यांनी या पुस्तकातून झालेल्या प्रश्नपत्रिका एकदम तोंड पाठ करून टाका. प्रश्नपत्रिका सोडवताना तुमच्या बऱ्याच गोष्टी क्लियर होतील. जसे कोणत्या प्रकरणावर जास्त भर आहे? कोणते प्रकरण आपल्याला समजायला अवघड जाते? जे प्रकरण अवघड जाते, त्यावर कशा पद्धतीने अधिकाधिक मेहनत घेता येईल? त्यानुसार तुम्हाला तुमचा स्वतःचा पुढचा प्लॅन ठरवता येईल. परंतु परीक्षा आल्यावर एकदम जागे होऊ नका. आधीपासूनच अभ्यास असणे आवश्यक आहे. सराव टेस्ट देणे खूप महत्वाचे आहे.

**'सामान्य ज्ञान' मधील कोणत्या घटकावर जास्त प्रश्न येतात ?**

– सामान्य ज्ञान मधील भूगोल, वने व पर्यावरण हे घटक सर्वात महत्त्वाचे आहेत. त्यासोबतच इतिहास, भूगोल, राज्यघटना, चालू घडामोडी यावर सुद्धा प्रश्न येतात. शक्यतो विज्ञान या घटकावर प्रश्न येत नाहीत.

**मराठी विषयाचा अभ्यास करताना काय स्ट्रॅटर्जी आखावी ?**

– मराठी विषयाला शब्दार्थ आणि काही निवडक व्याकरणाचे प्रकरण यावर पुन्हा पुन्हा प्रश्न येतात. मराठी विषय तुम्हाला कमीत कमी कालावधीमध्ये सर्वाधिक गुण देऊ शकतो, त्यामुळे या विषयाकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. 30 पैकी 30 गुण मिळवण्याचा हा विषय समजा.

**इंग्रजी विषयाची भीती वाटते. त्यासाठी काय केलं पाहिजे ?**

– तुमच्यापैकी बहुतेक विद्यार्थ्यांप्रमाणे आम्ही सुद्धा जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमात शिकलेलो आहोत. इंग्रजी ही फक्त भाषा आहे. शांत डोक्याने, योग्य मार्गदर्शन, योग्य पुस्तक सूची वापरली, योग्य दिशेने अभ्यास केला, तर इंग्रजी सारखा विषय महिनाभरात बराच कव्हर होतो. त्यासाठी तुम्हाला वेळ द्यावाच लागेल. सराव करावाच लागेल. पुन्हा पुन्हा रिविजन द्यावीच लागेल. इंग्रजी नक्की तुम्हाला आपलीशी वाटेल आणि तुम्हाला येणाऱ्या परीक्षेमध्ये नक्कीच गुण देईल.

**गणित बुद्धिमत्ता या घटकाबद्दल काय strategy असावी ?**

– गणित या घटकावर क्वचितच प्रश्न आलेले आढळतात. त्यातही मुख्यतः पदावली या घटकावर प्रश्न आलेले आढळतात. त्यासोबतच काळ काम वेग, वेग वेळ अंतर हे घटकही करून ठेवावेत. बुद्धिमत्ता या घटकावर मात्र जास्त प्रश्न येतात. वर्ण मालिका, अंकमालिका, विसंगत घटक, दिशा, नातेसंबंध, बैठक व्यवस्था, आकृत्या वरील प्रश्न, लहान मोठा, चिन्हांची अदलाबदल, शब्दकोशानुसार शब्दांची मांडणी या घटकावर पुन्हा पुन्हा प्रश्न येतात. त्यामुळे या घटकावर जास्तीत जास्त फोकस ठेवावा.

**सराव टेस्ट किंवा टेस्ट सिरीज बद्दल सांगा ?**

– कोणतीही परीक्षा असली तरी सराव टेस्ट देणे अत्यावश्यक आहे. सराव टेस्ट मुळे आपल्याला कशा प्रकारचे प्रश्न येऊ शकतात, आपण कोणत्या घटकात कमी पडतो, या गोष्टी समजतात. झालेल्या प्रश्नपत्रिका तुम्ही सराव टेस्ट म्हणून सोडल्या आणि त्यानंतर त्या खालील सखोल विश्लेषण केले तरी पुरेसे आहे. तरीसुद्धा अतिरिक्त अभ्यासासाठी तुम्ही योग्य ती टेस्ट सिरीज लावू शकता. महाराष्ट्र अकॅडमी या ॲपमध्ये लवकरच वनरक्षक भरतीसाठी खास टेस्ट सिरीज चालू होणार आहे. डेमो पहा, योग्य वाटली तर तुम्ही नक्की जॉईन करू शकता.

**ऑनलाइन किंवा ऑफलाइन क्लास बद्दल सांगा ?**

ऑफलाइन क्लास तुमच्या जवळ असेल आणि दर्जेदार असेल, तर आवश्यकता असेल तर नक्की केला पाहिजे. उगाचच उपलब्ध नाही म्हणून कोणताही ऑफलाइन क्लास लावू नका. ऑनलाईन क्लास लावताना क्लासला शिकवणारे शिक्षक त्या योग्यतेचे आहेत का ? शिकवण्याचा दर्जा कसा आहे ? शिकवलेल्या समजत आहे का ? हे बघूनच जॉईन करा. वनरक्षक भरतीसाठी आम्ही जरी बॅच चालू केली असेल तरीसुद्धा एकदा पहा, आवडलं तरच जॉईन करा.

**मैदानी चाचणीसाठी आतापासून काय करावे ?**

– मैदानी चाचणी ही तुमची लेखी परीक्षा झाल्यावर दोन ते तीन महिन्यांनी असते. जरी थोडाफार कालावधी मागेपुढे झाला, तरी त्या काळात पूर्णवेळ मैदानी करून जास्तीत जास्त गुण घेता येतात. तरीसुद्धा विद्यार्थ्यांनी थोडाफार व्यायाम, धावणे या गोष्टी कराव्यात. पूर्णवेळ करण्याची गरज नाही, परंतु व्यायाम केल्याने तुम्हाला थकवा कमी जाणवतो, अभ्यासाला मन लागते आणि दिवसभर एनर्जी टिकून राहते.

❑❑

**मुख्यमंत्री** (Chief Minister)

⬇

**वनमंत्री** (Forest Minister)

⬇

**वनबल प्रमुख** (P.C.C.F. - 1 पद)

⬇

**प्रधान मुख्य वनसंरक्षक** (P.C.C.F. - 4 पदे)

⬇

**अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक** (A.P.C.C.F.)

⬇

**मुख्य वनसंरक्षक** (C.C.F.)

⬇

**वन संरक्षक** (C.F.)

⬇

**उपवन संरक्षक** (D.C.F.)

⬇

**विभागीय वन अधिकारी** (D.F.O.)

⬇

**सहाय्यक वनसंरक्षक** (A.C.F.)

⬇

**वनक्षेत्रपाल** (R.F.O.)

⬇

**वनपाल** (R.O.)

⬇

**वनरक्षक** (F.G.)

⬇

**वनसेवक / वनमजूर**

## भारतीय वनांचा अभ्यास

**वनांचा उपयोग व आर्थिकदृष्ट्या महत्त्व :–**

भारतामध्ये विविध प्रकारची विविध वने आढळतात. आर्थिकदृष्ट्या वनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वनांतील प्रमुख उत्पादन म्हणजे लाकूड. लाकडापासून जहाजनिर्मिती, कागदनिर्मिती, फर्निचर, इमारतींसाठी. रेल्वेच्या स्लीपर्स व इंधनासाठी तसेच इतरही अन्य कारणांसाठी उपयोगिता आहे. मध, कात, वनौषधी, डिंक, फळे, फुले, कंदमुळे यांसारखी मौल्यवान उत्पादने आपणांस वनांतूनच मिळतात. आदिवासी लोकांच्या जीवनात वनांचे अनन्यसाधारण महत्व आहे. वनांतून मिळणाऱ्या विविध प्रमुख व दुय्यम वनोत्पादनापासून आदिवासींना जीवन जगण्याची ऊर्जा मिळते. सागवान, देवदार, चंदन या वृक्षांचा आर्थिक दृष्ट्या खूप उपयोग होतो. जंगलातील वृक्षांमुळे पर्यावरण अधिक संतुलित राहून मानवाचे तसेच सजीवसृष्टीचे संरक्षण होते.

- भारतात दर दोन वर्षांनी वनांचे सर्वेक्षण केले जाते.
- पहिले वन सर्वेक्षण – १९८७
- १८ व्या ISFR नुसार (India State of forest Report) : 2023
- एकूण वनाच्छादित प्रदेश (Forest Cover) = २१.७६% ; (भारताच्या क्षेत्रफळाशी)

एकूण वृक्षाच्छादित प्रदेश (Tree Cover) = ३.४१%

एकूण = २१.७६% + ३.४१% = २५.१७%

- राष्ट्रीय वन धोरण १९८८ नुसार, एकूण भौगो. क्षेत्राच्या ३३% क्षेत्र वने व वृक्षांनी आच्छादलेले असणे आवश्यक आहे.
- ISFR नुसार –

| सर्वाधिक वनक्षेत्र असलेली ३ राज्ये |
|---|
| १) मध्यप्रदेश |
| २) अरूणाचल प्रदेश |
| ३) महाराष्ट्र |

- २०१०-२०२० या दशकांत सरासरीनुसार सर्वाधिक वनक्षेत्रे असलेले देश :

१) रशिया २) ब्राझील ३) अमेरिका ४) कॅनडा ५) चीन (उतरता क्रम)

| BSI : | ZSI : |
|---|---|
| Botanical Survey of India | Zoological Survey of India |
| वनस्पतीजीवन सर्वेक्षण | प्राणीजीवन सर्वेक्षण |
| मुख्यालय : कोलकाता | मुख्यालय : कोलकाता |
| स्थापना : १३ फेब्रुवारी १८९० | स्थापना : १ जुलै १९१६ |
| कार्य : भारतातील वनस्पती जीवनाचे सर्वेक्षण व संशोधन | कार्य : भारतातील प्राणीजीवनाचे सर्वेक्षण व संशोधन |

- भारतातील वन्यजीव संवर्धनासाठी खालील उपक्रम सुरू केले.

| प्रकल्प | सुरुवात |
|---|---|
| हंगूल प्रकल्प (काश्मिरी स्टॅग) | १९७० |
| गीर सिंह प्रकल्प | १९७२ |
| व्याघ्र प्रकल्प | १९७३ |
| मगर पैदास प्रकल्प | १९७४ |
| ताम्हीण हरिण प्रकल्प | १९७७ |
| गेंडा संवर्धन प्रकल्प | १९८७ |
| हत्ती प्रकल्प | १९९२ |
| रेड पांडा प्रकल्प | १९९६ |
| प्रोजेक्ट डॉल्फिन | २०२१ |
| चित्ता प्रकल्प | २०२२ |

**ट्रीक – हसिवाम ताम्हीण गेंडे से हरे**

- हत्तींच्या अवैध शिकारीच्या देखरेखीचा कार्यक्रम – माईक कार्यक्रम (MIKE)
  – २००३ मध्ये सुरू
  – भारतातील १३ राज्यांत राबवला जातो.
- भारतातील राष्ट्रीय उद्याने

WII-Wildlife Institute of India भारतीय वन्यजीव संस्था वेबसाईटनुसार सद्य:स्थितीतील भारतात एकूण (२६ जाने. २०२३) १०६ राष्ट्रीय उद्याने आहेत.

- सर्वाधिक राष्ट्रीय उद्याने :

१) मध्य प्रदेश = ११

२) आसाम = ७

३) पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार, महाराष्ट्र, केरळ = प्रत्येकी ६

- एकही राष्ट्रीय उद्यान नसलेली राज्ये आणि केंद्र प्रदेश –

पंजाब, चंदीगड, दादरा-नगर हवेली व दमण-दीव, दिल्ली, लक्षद्वीप, पुदुच्चेरी

- महाराष्ट्रात एकूण ६ राष्ट्रीय उद्याने आहेत.

| | |
|---|---|
| १) ताडोबा - अंधारी | चंद्रपूर |
| २) संजय गांधी | बोरिवली, मुंबई |
| ३) चांदोली | सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी |
| ४) नवेगाव - नागझिरा | गोंदिया |
| ५) गुगामल | अमरावती |
| ६) पेंच | नागपूर |

- **Indian Board for Wild Life (IBWL)**

– भारतीय वन्यजीव मंडळ वने व वन्यजीव यांचे संरक्षण व विकास करते.

– स्थापना : १९५२

– पदसिद्ध अध्यक्ष : पंतप्रधान

- बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)

| सागरी राष्ट्रीय उद्यान | राज्य | स्थापना |
|---|---|---|
| मन्नारचे आखात | तामिळनाडू | १९८६ |
| सुंदरबन | पश्चिम बंगाल | १९८४ |
| कच्छचे आखात | गुजरात | १९८० |
| महात्मा गांधी | अंदमान-निकोबार | १९८३ |
| झाशीची राणी | अंदमान-निकोबार | १९९६ |
| भितरकणिका | ओडीशा | १९८८ |

- आकडेवारी भारतीय वन्यजीव संस्था यांच्या वेबसाईटनुसार

| संरक्षित क्षेत्रे | संख्या (भारतातील) | संख्या (महाराष्ट्रातील) |
|---|---|---|
| राष्ट्रीय उद्याने | १०६ | ६ |
| वन्यजीव अभयारण्ये | ५७३ | ५७ |
| संवर्धन राखीव क्षेत्रे | ११५ | १२ |
| लोकसमुदाय राखीव क्षेत्रे | १०५ | ० |
| एकूण | ९९८ | ७५ |

- सध्या डिसेंबर २०२४ पर्यंत भारतातील महत्त्वाची संवर्धन क्षेत्रे :

| राखीव क्षेत्र/स्थळ | भारतातील संख्या | महाराष्ट्रातील संख्या |
|---|---|---|
| व्याघ्र राखीव क्षेत्र | ५७ | ६ |
| जीवावरण राखीव क्षेत्र | १८ | ० |
| रामसर पाणथळ स्थळे | ८५ | ३ |
| सांस्कृतिक जागतिक वारसा स्थळे | ३५ | ५ |
| मिश्र जागतिक वारसा स्थळे | १ | ० |
| नैसर्गिक जागतिक वारसा स्थळे | ८ | १ |

- जगातील सर्वात पहिले राष्ट्रीय उद्यान : यलोस्टोन, अमेरिका (स्थापना : १८७२)
- जीम कार्बेट हे भारतातील पहिले राष्ट्रीय उद्यान आहे. याची स्थापना १९३६ साली झाली व १९५७ मध्ये 'जीम कार्बेट' हे नाव देण्यात आले.

**भारतातील महत्त्वाची राष्ट्रीय उद्याने :–**

| राष्ट्रीय उद्यान | स्थान (राज्य) |
|---|---|
| जीम कार्बेट (वाघांसाठी राखीव) (भारतातील पहिले राष्ट्रीय उद्यान) | उत्तराखंड |
| ताडोबा - अंधारी (वाघ आणि मगरींसाठी) | महाराष्ट्र |
| जवाहरलाल नेहरू पेंच राष्ट्रीय उद्यान | नागपूर |
| नवेगांव बांध | गोंदिया |
| संजय गांधी | बोरिवली, मुंबई |
| चांदोली - सातारा, सांगली, कोल्हापूर व रत्नागिरी | महाराष्ट्र |
| कान्हा (कृष्णा) (वाघांसाठी राखीव) | मध्य प्रदेश |
| माधव | मध्य प्रदेश |
| नामदफा | अरूणाचल प्रदेश |
| काझीरंगा | आसाम |
| मानस | आसाम |
| ओरांग | आसाम |
| नोकरेक | मेघालय |
| मूर्लेन | मिझोराम |
| इंटाकी | नागालँड |
| हायसन (राजबरी) | त्रिपुरा |
| कैबुल-लामजाओ | मणिपूर |
| खांगजेनझोंगा | सिक्कीम |
| पापीकोंडा | आंध्र प्रदेश |
| राजीव गांधी (रामेश्वरम) | आंध्र प्रदेश |
| गल्फ ऑफ मन्नार (सागरी) | तामिळनाडू |

| राष्ट्रीय उद्यान | स्थान (राज्य) |
|---|---|
| इंदिरा गांधी (अन्नामलाई) | तामिळनाडू |
| मदुमलाई | तामिळनाडू |
| कासू ब्रम्हानंद | तेलंगाणा |
| महावीर वनस्थळी (हरीण) | तेलंगाणा |
| अन्नामुडी सोला | केरळ |
| पेरियार | केरळ |
| सायलेंट व्हॅली | केरळ |
| बांधवगड | मध्य प्रदेश |
| इंदिरा प्रियदर्शनी पेंच | मध्य प्रदेश |
| पन्ना | मध्य प्रदेश |
| नागरहोल | कर्नाटक |
| कुद्रेमुख | कर्नाटक |
| बंदिपूर | कर्नाटक |
| गुरू घासीदास | छत्तीसगड |
| भगवान महावीर | गोवा |
| रणथंबोर | राजस्थान |
| केवलादेव घाना | राजस्थान |
| मुकुंद्रा हिल्स | राजस्थान |
| सारिस्का | राजस्थान |
| गीर | गुजरात |
| कच्छचे आखात (सागरी) | गुजरात |
| वाल्मिकी | बिहार |
| सुलतानपूर | हरियाणा |
| दुधवा | उत्तरप्रदेश |
| सिम्लीपाल | ओडीशा |
| भितरकणिका | ओडीशा |
| बक्सा | पश्चिम बंगाल |
| जलदापरा | पश्चिम बंगाल |
| सुंदरबन | पश्चिम बंगाल |
| गंगोत्री | उत्तराखंड |
| गोविंद | उत्तराखंड |
| नंदादेवी | उत्तराखंड |
| जिम कार्बेट | उत्तराखंड |
| ग्रेट हिमालयीन | हिमाचल प्रदेश |
| खीरगंगा | हिमाचल प्रदेश |
| सलीम अली | जम्मू-काश्मीर |
| दाचीगाम | जम्मू-काश्मीर |
| किश्तवार | जम्मू-काश्मीर |
| महात्मा गांधी (सागरी) | अंदमान-निकोबार |
| झाशीची राणी (सागरी) | अंदमान-निकोबार |

**भारत : अभयारण्ये :**

- सध्या भारतात ५६७ अभयारण्ये आहेत.

सर्वाधिक अभयारण्ये : १) अदंमान-निकोबार - ९७
२) महाराष्ट्र - ५७    ३) तामिळनाडू - ३१

**काही महत्त्वाची अभयारण्ये :**

| राज्य | अभयारण्य |
|---|---|
| आंध्र प्रदेश | कोरींगा<br>नेल्लापट्टू<br>पुलिकत सरोवर |
| अरूणाचाल प्रदेश | दिबांग<br>इटानगर<br>केन |
| आसाम | दीपोरबील<br>पाबीतोरा<br>गरमपानी<br>पानीदिहांग (पक्षी) |
| दिल्ली | असोल भट्टी<br>(प्रियदर्शनी इंदिरा) |
| बिहार | गौतम बुद्ध<br>वाल्मिकी |
| हिमाचल प्रदेश | छौलाधार<br>शिक्रीदेवी<br>मनाली<br>रेणुका |
| हरियाणा | भिंडवास<br>नाहर<br>अबुशहर |
| गुजरात | बलराम अंबाजी<br>गीर<br>गीरनार<br>कच्छचे आखात |

| राज्य | अभयारण्य |
|---|---|
| जम्मू-काश्मीर | हीरपोरा<br>त्रिकुट<br>नंदिनी<br>रामनगर राखा |
| झारखंड | गौतम बुद्ध<br>हजारीबाग<br>पारसनाथ<br>पलमाऊ |
| कर्नाटक | अरीबी थिट्टू<br>इरावती<br>भद्रा<br>गुडावी (पक्षी)<br>दांडेली<br>सोमेश्वर<br>चिंचोली |
| लक्षद्वीप | पिट्टी (पक्षी) |
| केरळ | इडुक्की<br>चिन्नार<br>पेरियार<br>वायनाड |
| मध्य प्रदेश | पेंच<br>कुनो<br>संजय डुबरी<br>गांधी सागर<br>चंबळ |
| मेघालय | बाघमारा |
| नागालँड | फकीम |
| ओडीशा | भितरकणिका<br>सिम्लीपाल<br>दिब्रुगड<br>गहिरमाथा (सागरी) |
| पंजाब | अभोर<br>हरिके सरोवर<br>नांगल |

| राज्य | अभयारण्य |
|---|---|
| राजस्थान | माऊंट अबू<br>रामसागर<br>सवाई मानसिंग<br>जवाहर सागर |
| सिक्कीम | सीतामाता<br>पँगोलखा<br>बारसे |
| तामिळनाडू | गंगाईकोंडम (हरिणे)<br>चित्रागुडी (पक्षी)<br>इंदिरा गांधी (अन्नामलाई)<br>मुदुमलाई<br>वेल्लोर (पक्षी) |
| त्रिपुरा | त्रिष्णा<br>रोवा |
| उत्तर प्रदेश | बखिरा<br>लाख बहोशी (पक्षी)<br>हस्तिनापूर<br>समसपूर (पक्षी)<br>जयप्रकाश नारायण (पक्षी) |
| पश्चिम बंगाल | बक्सा<br>रायगंज<br>महानंदा<br>चिंतामणी कार (पक्षी)<br>सुंदरबन |
| उत्तराखंड | केदारनाथ<br>मसूरी<br>गोविंद पशू बिहार |

**भारत : व्याघ्र प्रकल्प – (२०२३ – सुवर्ण महोत्सव)**

- भारतात १९७३ साली व्याघ्र प्रकल्पाची सुरूवात झाली.
- व्याघ्र प्रकल्प संपूर्णत: केंद्र सरकारच्या अखत्यारित असतात.
- प्रथमत: व्याघ्र प्रकल्प हा ९ ठिकाणी सुरू करण्यात आला होता.
- व्याघ्र प्रकल्प सुरू होण्यामागे 'वर्ल्डवाईड फंड फॉर नेचर' या संस्थेची प्रेरणा महत्वाची होती.
- क्षेत्रफळाच्या दृष्टीने

१) सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प – नागार्जुनसागर, श्रीशैलम = ३२९६ चौ.किमी

२) सर्वात लहान व्याघ्र प्रकल्प – नामेरी, आसाम = ३४४ चौ.किमी.

- भारतात दर ४ वर्षांनी वाघांची गणना केली जाते.
- पहिली व्याघ्र गणना – २००६ साली झाली, तेव्हा भारतात १४११ वाघ होते.
- दुसरी गणना = २०१०
- तिसरी गणना = २०१४ साली, यावेळी वाघांची संख्या = २२२६
- चौथी गणना = २०१८ साली यावेळी वाघांची संख्या = २९६७
- **चौथ्या गणनेनुसार :–२०१८ साली –**

  १) मध्यप्रदेश – ५२६ वाघ

  २) कर्नाटक – ५२४ वाघ

  ३) उत्तराखंड – ४४२ वाघ

  ४) महाराष्ट्र – ३१२ वाघ (२०१४ – १९० वाघ होते.)

  **ट्रीक – M K U M**

- **पाचवी गणना :–२०२२**
- एकूण वाघ – ३१६७
- २०१८ पेक्षा ६.७% वाढ (२०० वाघांची वाढ)
- सर्वाधिक वाघ – (१) कर्नाटक, (२) मध्य प्रदेश
- महाराष्ट्र – ४४६ वाघ (२२% वाढ)
- जगाचा विचार केल्यास, सर्वाधिक वाघ भारतात आहेत.
- सध्या भारतात ५७ व्याघ्र प्रकल्प आहेत. (५३ वा राणीपूर व्याघ्र प्रकल्प (उत्तर प्रदेश), ५४ वा – वीरागंना दुर्गावती व्याघ्र प्रकल्प (मध्य प्रदेश), ५५ वा – ढोलपूर करौली (राजस्थान), ५६ वा – गुरू घासीदास–तमोर पिंगला (छत्तीसगड), ५७ वा – रतापाणी वन्यजीव अभयारण्य (मध्य प्रदेश) मान्यता दिली आहे.)
- सध्या महाराष्ट्रात ६ व्याघ्र प्रकल्प आहेत.
- सर्वाधिक व्याघ्र प्रकल्प – मध्यप्रदेश, महाराष्ट्र – प्रत्येकी ६
- भारताची व्याघ्र राजधानी – नागपूर

| व्याघ्र प्रकल्प | राज्य |
|---|---|
| मानस<br>नामेरी<br>ओरांग | आसाम<br>आसाम<br>आसाम |
| नागार्जुनसागर | आंध्रप्रदेश |
| फक्के (पक्के)<br>नामदफा<br>कमलांग | अरूणाचल प्रदेश<br>अरूणाचल प्रदेश<br>अरूणाचल प्रदेश |
| वाल्मिकी | बिहार |
| उदंती–सिदंती<br>अचानकमार<br>इंद्रावती | छत्तीसगड<br>छत्तीसगड<br>छत्तीसगड |
| पलामाऊ (प्लामू) | झारखंड |
| बांदीपूर<br>भद्रा<br>बिलीगीरी | कर्नाटक<br>कर्नाटक<br>कर्नाटक |
| कान्हा<br>पेंच<br>बांधवगड, रातापाणी<br>वीरांगना दुर्गावती | मध्य प्रदेश<br>मध्य प्रदेश<br>मध्य प्रदेश |
| डाम्पा | मिझोराम |
| सिम्लीपाल | ओडीशा |
| सत्कोसिया | ओडीशा |
| रणथंबोर<br>सारिक्का<br>मुकुंद्रा हिल्स | राजस्थान<br>राजस्थान<br>राजस्थान |
| अन्नामलाई<br>मदुमलाई<br>सत्यमंगलम | तामिळनाडू<br>तामिळनाडू<br>तामिळनाडू |
| कावल | तेलंगाणा |
| अमराबाद | तेलंगाणा |
| दुधवा | उत्तर प्रदेश |
| पिलभीत | उत्तर प्रदेश |
| कार्बेट | उत्तराखंड |
| राजाजी | उत्तराखंड |
| सुंदरबन | पश्चिम बंगाल |
| बक्सा | पश्चिम बंगाल |
| श्रीविल्लीपुतुर<br>मेगामलाई | तामिळनाडू |
| रामगढ विषधारी<br>राणीपूर | राजस्थान<br>उत्तर प्रदेश |

- १८६४ – भारतात इंपिरियल फॉरेस्ट डिपार्टमेंटची स्थापना
- डॉ. डिट्रिक ब्रांडीश हे जर्मन वन अधिकारी भारतातील पहिले वन महानिरीक्षक बनले.
- १८६७ – इंपिरियल फॉरेस्ट सर्व्हिसची स्थापना.
- १९०६ – डेहराडून (उत्तराखंड) येथे इंपिरियल फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना.

  – या संस्थेत भारतीय वन अधिकाऱ्यांना (IF.S) प्रशिक्षण दिले जाते.
- १९७७ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्ती (१९७६) नुसार जंगल (वन) हा विषय समवर्ती सूचीत समविष्ट झाला.
- ॲनिमल वेल्फेअर इन्स्टिट्यूट – वल्लभगड (हरियाणा) येथे आहे.
- भारतात १९५२ पासून 'वन महोत्सवास' प्रारंभ झाला.

  – याचे श्रेय वनमंत्री (तत्कालीन) कन्हैयालाल मुन्शी यांना जाते.

  – दरवर्षी जुलैच्या पहिल्या आठवड्यात 'वन महोत्सव' सुरू होतो.

**भारतातील वनांचे प्रमुख प्रकार**

- **उष्णकटिबंधीय सदाहरित वने :–**

  – वितरण : पश्चिम घाट, ईशान्य भारत, अंदमान–निकोबार

  – हवामान : उष्ण व दमट, वार्षिक पर्जन्य २०० सेमी पेक्षा जास्त

  – मुख्य वनस्पती : ऐन, एबोनी, रोजवूड, महोगनी

  **वैशिष्ट्ये**

  – वृक्षांची उंची ६० मी किंवा जास्त.

  – फळ धारणा, पानगळतीचा निश्चित काळ नसतो.
- **उष्ण कटिबंधीय निमसदाहरित वने :–**

  मुख्य वनस्पती : केल, होलॉक, सफेद देवदार
- **उष्ण कटिबंधीय मान्सून / पानझडी वने :– (सर्वाधिक क्षेत्र असलेली वने)**

  – वितरण :– पश्चिम घाट, हिमालयाचा पायथा, ईशान्य भारत, ओडीशा

  – वार्षिक पर्जन्य १०० ते २०० सेंमी

  वृक्ष : साल, सागवान, महुआ, शिसम, चंदन, शाल्मली

  **शुष्क पानझडी वने**

  – उत्तर प्रदेशचा आणि बिहारचा मैदानी प्रदेश, उत्तर भारतीय मैदानांचा आणि भारतीय द्वीपकल्पाचा कमी पर्जन्याचा प्रदेश येथे ही वने आढळतात.
- पर्जन्य : वार्षिक ७० ते १०० सेंमी.

  वृक्ष : बहावा, तेंदू, बेल, पळस, खैर, धावडा
- **पर्वतीय वने :–**

  वितरण :–

  – उत्तर पर्वतीय वने

  – दक्षिण पर्वतीय वने

  – पश्चिम घाट

  – विंध्य पर्वत, निलगिरी पर्वत, सातपुडा व मैकल पर्वत

  – पर्वतीय प्रदेशात वाढत्या उंची सोबत तापमान कमी होते.

  – वृक्ष :– लॉरेल, सिंकोना, वॅटल, मॅग्नोलिया
- **लिट्टोरल आणि स्वॅम्प वने (दलदलीची वने) :–**

– भारतात सर्वाधिक खारफुटीची वने पश्चिम बंगालमध्ये व महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यात आहेत.

– यामध्ये दलदली परिसंस्था आणि खारफुटी वनांचा समावेश होतो.

**महाराष्ट्र : वने**

- महाराष्ट्रात वनस्पतींचे ६ वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आढळतात.

**१) उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये :–**

प्रदेश :– कोकण भागात सह्याद्रीच्या पायथ्यालगत सिंधुदुर्ग जिल्ह्यांत.

वार्षिक पर्जन्य :– २०० सें.मी. किंवा जास्त पर्जन्य असणाऱ्या प्रदेशात.

वृक्षांची उंची :– ४५–६० मी.

प्रमुख वृक्ष :– नागचंपा, पांढरा सिडार, फणस, कावसी, जांभूळ इत्यादी

**२) उष्ण कटिबंधीय निमसदाहरित अरण्ये :–**

प्रदेश :– सदाहरित अरण्ये व पानझडीची अरण्ये यांच्या संक्रमणावस्थेत पश्चिम किनारपट्टीवर कोकणात तसेच सह्याद्री पर्वताच्या पश्चिम भागात विशेषत: इगतपुरी, लोणावळा (पुणे), आंबोली (सिंधुदुर्ग) भागात.

वार्षिक पर्जन्य : २०० सें.मी. पेक्षा कमी

वृक्षांचे स्वरूप :– सदाहरित अरण्यांतील वृक्षांपेक्षा कमी उंचीचे वृक्ष. वर्षभर हिरवेगार वृक्ष पाहायला भेटतात.

प्रमुख वृक्ष : किंडल, रानफणस, नाना, कदंब, शिसम, बिबळा

**३) उप–उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये :–**

प्रदेश : महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान व भीमाशंकरच्या परिसरात. उत्तर महाराष्ट्रात गाविलगड टेकड्यांत.

पर्जन्य : २५० सेंमी. पेक्षा जास्त पर्जन्य

वृक्षांचे स्वरूप : मध्यम तापमान, दीर्घ पाऊस व आर्द्रता (दमटपणा) या घटकांचे प्रमाण आवश्यक.

वृक्ष :– आंबा, बेहडा, कावसी, जांभळा, अंजन, हिरडा इत्यादी या प्रदेशातील वनांत 'मधुमक्षिकापालन' चालते.

**४) उष्ण कटिबंधीय आर्द्र पानझडी/मान्सून प्रकारची अरण्ये :–**

प्रदेश :– भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांत तसेच गाविलगड टेकड्यांत.

पर्जन्य :– १२० – १६० सें.मी.

या प्रदेशातील वने 'अल्लापल्ली अरण्ये' म्हणूनही प्रसिद्ध.

वृक्षांची उंची :– ३०–४० मीटर

वृक्ष :– प्रमुख वनस्पती :– सागवान आहे.

किंडल, लेंडी, हिरडा, बिबळा, कुसुम, आवळा, शिसम इत्यादी.

**५) उष्ण कटिबंधीय आर्द्र पानझडी अरण्ये :–**

प्रदेश :– सातपुडा पर्वतरांगा व अजिंठा डोंगररांगेच्या प्रदेशात आढळतात.

पर्जन्य :– ८०–१२० सें.मी. पर्जन्य

वृक्षांचे स्वरूप :– वृक्षांचे सलग पट्टे नसतात. कमी व जास्त दोन्ही प्रकारच्या उंचीचे वृक्ष असतात. अधूनमधून गवताळ प्रदेश देखील आढळतात.

वृक्ष : बेल, खैर, अंजन, धावडा, सागवान, शिसम, तेंदू, पळस इत्यादी. खैराचा उपयोग – कात निर्मितीसाठी करतात.

**६) उष्ण कटिबंधीय काटेरी अरण्ये :–**

प्रदेश : मध्य महाराष्ट्रात, दखखन पठारावर

सोलापूर, पुणे, सातारा, सांगली व अहिल्यानगर जिल्हे तसेच मराठवाडा व विदर्भाच्या काही भागांत.

पर्जन्य : ८० सें.मी. पेक्षा कमी पर्जन्य.

वृक्षाचे स्वरूप : कोरड्या पावसाच्या प्रदेशातील वृक्ष आहेत. यातील झाडांचा उपयोग जळणासाठी (इंधन म्हणून) केला जातो.

वृक्ष : निंब, खैर, हिवर, बाभूळ इ.

तारवडाचा उपयोग टॅनिंगसाठी केला जातो.

- महाराष्ट्रात कोकणच्या किनारी भागांत दलदलीची वने किंवा पाणथळीची वने आढळतात.

  – यामध्ये अॅव्हिसिनिया, रायझोफोरा, चिपी, मरांडी यांसारखे कांदळवनीय वृक्ष आढळतात.

**– २ फेब्रु. : जा. पाणथळ संवर्धन दिवस.**

- सर्वाधिक वनक्षेत्राचा जिल्हा – गडचिरोली
- सर्वात कमी वनक्षेत्राचा जिल्हा – लातूर
- महाराष्ट्रात वन विभागाचे मुख्यालय – नागपूर
- २०२१ नुसार सर्वाधिक वनक्षेत्रात महाराष्ट्राचा ५ वा क्रमांक आहे, तर २०२३ नुसार महाराष्ट्राचा ३ रा क्रमांक आहे.
- महाराष्ट्रात ११ प्रादेशिक वनवृत्त आहेत.
  औरंगाबाद, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, धुळे, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, पुणे, ठाणे, यवतमाळ
- महाराष्ट्राचे काश्मीर – कास पठार (सातारा जिल्हा)
- महाराष्ट्राचे नंदनवन – महाबळेश्वर (सातारा जिल्हा)
- विदर्भाचे काश्मीर – चिखलदरा (अमरावती जिल्हा)
- महाराष्ट्राचे भरतपूर – नांदूर–मधमेश्वर (नाशिक जिल्हा)
- महाराष्ट्रातील अभयारण्ये – महाराष्ट्रात सध्या ५७ अभयारण्ये आहेत.

- पक्षी अभयारण्ये :

| | |
|---|---|
| कर्नाळा | रायगड |
| माळढोक | अहिल्यानगर व सोलापूर |
| नांदूर–मधमेश्वर | नाशिक |
| नायगाव (मोर) | बीड |
| मायणी (इंदिरा गांधीचे नाव) | सातारा |



## महाराष्ट्रातील अभयारण्ये : विभागवार

### १) कोकण विभाग :

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| कर्नाळा (पक्षी) | रायगड |
| तानसा | पालघर |
| फणसाड | रायगड |
| तुंगारेश्वर | पालघर |
| मालवण (महाराष्ट्रातील एकमेव सागरी अभयारण्य) | सिंधुदुर्ग |




### २) पुणे विभाग :

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| राधानगरी (गव्यांसाठी प्रसिद्ध) | कोल्हापूर |
| कोयना | सातारा |
| भीमाशंकर (शेकरू खारींसाठी प्रसिद्ध) | पुणे व ठाणे |
| सागरेश्वर (हरिणांसाठी) | सांगली |
| मयुरेश्वर | पुणे |
| सुधागड | पुणे-रायगड |



### ३) नाशिक विभाग :

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| यावल | जळगाव |
| रेहेकुरी-देऊळगाव(काळवीटांसाठी प्रसिद्ध) | अहिल्यानगर |
| माळढोक (पक्षी) | अहिल्यानगर व सोलापूर |
| कळसूबाई-हरिश्चंद्रगड | अहिल्यानगर |




### ४) औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) विभाग :

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| गौताळा - औट्रमघाट | छ. संभाजीनगर -जळगाव |
| जायकवाडी (पक्षी) | छ. संभाजीनगर |
| नायगाव (मोर) | बीड |
| येडशी-रामलिंग घाट | धाराशीव |
| नवीन माळढोक | धाराशीव |

### ५) अमरावती विभाग (पश्चिम विदर्भ)

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| पैनगंगा | यवतमाळ-नांदेड |
| मेळघाट | अमरावती |
| काटेपूर्णा | अकोला |
| आंबा बरवा | बुलढाणा |
| ज्ञानगंगा | बुलढाणा |
| नर्नाळा (पक्षी) | अकोला |
| टिपेश्वर | यवतमाळ |
| इसापूर | यवतमाळ |
| वान | अमरावती |
| लोणार | बुलढाणा |
| कारंजा-सोहोळ (काळवीटांसाठी) | अकोला-वाशिम |






**६) नागपूर विभाग**

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| बोर | वर्धा–नागपूर |
| नागझिरा | भंडारा–गोंदिया |
| उमरेड–कऱ्हांडला | भंडारा–नागपूर |
| नवीन नागझिरा | गोंदिया |
| कोलामार्क (रानम्हशी) | गडचिरोली |
| चपराळा | गडचिरोली |
| अंधारी | चंद्रपूर |
| भामरागड | गडचिरोली |
| कन्हाळगाव | चंद्रपूर |




- **महाराष्ट्र : ६ राष्ट्रीय उद्याने**

| राष्ट्रीय उद्यान | जिल्हा | घोषणा(निर्मिती) |
|---|---|---|
| १) ताडोबा-अंधारी | चंद्रपूर | १९५५ |
| २) पेंच (पं. जवाहरलाल नेहरू उद्यान) | नागपूर | १९७५ |
| ३) नवेगाव बांध | गोंदिया | १९७५ |
| ४) संजय गांधी | मुंबई उपनगर | १९८३ |
| ५) गुगामल | अमरावती | १९८७ |
| ६) चांदोली | सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी | २००४ |




**महाराष्ट्र : रामसर स्थळे**

- भारतात ८५ रामसर स्थळे आहेत.
  त्यापैकी ३ रामसर स्थळे महाराष्ट्रात आहेत.
  १) नांदूर–मधमेश्वर – नाशिक जिल्हा
  २) लोणार सरोवर – बुलढाणा
  ३) ठाणे – फ्लेमिंगो खाडी



**व्याघ्र प्रकल्प :**

- १९७२ साली वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी घोषित केला गेला.
- भारतात व्याघ्र प्रकल्प योजनेचे जनक : श्री. कैलास सांकला.
- व्याघ्र प्रकल्प योजना भारतात सर्वप्रथम जीम कार्बेट राष्ट्रीय उद्यान उत्तराखंड येथून सुरू झाली.
- भारतात २००६ सालापासून व्याघ्रगणनेस प्रारंभ झाला.
- २०१४ साली भारतात २२२६ वाघ होते व २०१८ साली २९६७ वाघ होते. (२०२२ ला ३१६७ वाघ)
- महाराष्ट्रात २०२२ साली ४४६ वाघ होते तर २०१८ साली ३१२ वाघ होते.
- महाराष्ट्रातील पहिला व्याघ्र प्रकल्प – मेळघाट
- भारताची व्याघ्र राजधानी – नागपूर
- भारताचे व्याघ्र प्रवेशद्वार – नागपूर
- शास्त्रीय नाव – Panthera - tigris
- महाराष्ट्रात ६ व्याघ्र प्रकल्प आहेत.

| व्याघ्र प्रकल्प | जिल्हा | स्थापना |
|---|---|---|
| १) मेळघाट | अमरावती (मोठा) | १९७४ |
| २) ताडोबा-अंधारी | चंद्रपूर | १९९४ |
| ३) पेंच | नागपूर | १९९९ |
| ४) सह्याद्री | सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी | २०१० |
| ५) नवेगाव-नागझिरा | गोंदिया | २०१३ |
| ६) बोर | वर्धा | २०१४ |



- संत तुकाराम वनग्राम योजना : २००६ साली वनांच्या संरक्षणासाठी सुरू करण्यात आली.
- सर्वाधिक वनक्षेत्र – नागपूर प्रशासकीय विभाग
- सर्वात कमी वनक्षेत्र – मराठवाडा प्रशासकीय विभाग
- **महाराष्ट्र निसर्ग पर्यटन महामंडळ :**

स्थापना : डिसेंबर २०१५

मुख्यालय : नागपूर

- महाराष्ट्रातील सर्वात पहिले अभयारण्य – राधानगरी (दाजीपूर), कोल्हापूर,
  - १९५८ ला स्थापना झाली.
  - गव्यांसाठी प्रसिद्ध

| महाराष्ट्र | सर्वात मोठे | क्षेत्रफळ (चौ.किमी.) | स्थापना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय उद्यान | गुगामल | ३६१.२८ | १९७५ | अमरावती |
| अभयारण्य | नान्नज | १२२९ | १९७१ | अहिल्यानगर व सोलापूर |
| व्याघ्र प्रकल्प | मेळघाट | २७६९ | १९७४ | अमरावती |

| महाराष्ट्र | सर्वात लहान | क्षेत्रफळ (चौ.किमी.) | स्थापना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय उद्यान | संजय गांधी | ८६.९६ | १९७३ | बोरिवली व ठाणे |
| अभयारण्य | नवीन माळढोक | १.९८ | २०१२ | सोलापूर व धाराशीव |
| व्याघ्र प्रकल्प | पेंच | ७४१ | १९९९ | नागपूर |

- गडचिरोलीतील कोपेला कोलामार्क संवर्धन क्षेत्रात रानम्हशीचे वास्तव्य आहे.
- किशोर रिठे हे रानम्हशींच्या संवर्धनासाठी कार्यरत होते.
- महाराष्ट्रातील २ सागरी वन्यजीव अभयारण्ये :
- मालवण – सिंधुदुर्ग जिल्हा : १९८७ स्थापना
- ठाणे खाडी (फ्लेमिंगो) – २०१५ स्थापना
- IFSR Report 2021 नुसार भारतीय राज्य वन अहवाल : २०२१

**महाराष्ट्रात सर्वाधिक वनांचे प्रमाण :**

१) गडचिरोली– ६८.७१%

२) सिंधुदुर्ग – ५४.२३%

३) रत्नागिरी – ५१.३२%

**ट्रीक – गसिर**


वनरक्षक
ऑनलाइन बॅच
विषय
मराठी, गणित,-बुद्धिमत्ता, GK, इंग्रजी
कालावधी - 1 वर्ष
TCS - IBPS पॅटर्न प्रमाणे
फी - 1000 रु.
ऑफर फी
फक्त 300 रु.
मार्गदर्शक
विठ्ठल बडे (निवड PSI)
ज्ञानदेव बडे ( निवड PSI, TCS 2 वेळा निवड)
ज्ञानेश्वर बांगर (PSI मुलाखत)
राहुल भैसडे (TCS तज्ज्ञ)
म.अ.
महाराष्ट्र अकॅडेमी
App- Maharashtra Academy, Pune
whats app only
91 58 58 59 09

महाराष्ट्र पब्लिकेशन
ग्रामीण भागातील धडपडणाऱ्या तरुणाईसाठी

TCS-IBPS पॅटर्न नुसार

# वनरक्षक प्लॅनर 2025

वनसेवक पदांसाठी उपयुक्त



- वनविषयक तांत्रिक माहिती
- 2019 प्रश्नपत्रिका (प्रत्येक प्रश्नाच्या स्पष्टीकरणासह)
- 2024 च्या प्रश्नपत्रिका (प्रत्येक प्रश्नाच्या स्पष्टीकरणासह)
- अपेक्षित सराव प्रश्न

लेखक :
विठ्ठल बडे,
निवड PSI (महाराष्ट्र अकॅडेमी, पुणे)

म.अ. महाराष्ट्र अकॅडेमी
वनरक्षक ऑनलाईन बॅच
App- Maharashtra Academy, Pune

25x25 mm

फसवणूक टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी QR कोड स्कॅन करूनच पुस्तक खरेदी करावे.

TCS-IBPS पॅटर्न नुसार वनरक्षक प्लॅनर 2025
लेखक : विठ्ठल बडे,
निवड PSI (महाराष्ट्र अकॅडेमी, पुणे)


वनरक्षक
ऑनलाइन बॅच
विषय
मराठी, गणित,-बुद्धिमत्ता, GK, इंग्रजी
कालावधी - 1 वर्ष
TCS - IBPS पॅटर्न प्रमाणे
फी - 1000 रु.
ऑफर फी
फक्त 300 रु.
मार्गदर्शक
विठ्ठल बडे (निवड PSI)
ज्ञानदेव बडे ( निवड PSI, TCS 2 वेळा निवड)
ज्ञानेश्वर बांगर (PSI मुलाखत)
राहुल भैसडे (TCS तज्ज्ञ)
म.अ.
